# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक ०९/०६/२०२६ ( बुधवार )

---

## दुकानफोडीचे २ गुन्हे उघड, ३ आरोपी अटक
## ६३ हजार ८०० रूपयांचा मुद्देमाल जप्त
## देवलापार पोलीसांची कामगिरी

देवलापार पोलीस स्टेशन :— **पोलीस स्टेशन देवलापार अंतर्गत दिनांक २३/०५/२०२६ रोजी चे मध्यरात्री दरम्याण मौजा देवलापार येथे जैन किराणा दुकाणात अज्ञात चोरट्यंकडून किराणा माल चोरी प्रकरणात तक्रारदारचे तक्रारी वरून पोस्टे देवलापार येथे अपराध क्रमांक २६७/२०२६ कलम ३३१ (४),३०५ (अ) भा.न्या.स अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. तसेच दिनांक २६/०५/२०२६ चे मध्य रात्री मौजा पवनी येथील विवान मोबाईल शॉपी येथे झालेल्या मोबाईल व ईलेक्ट्रीक साहित्य चोरी प्रकरणात तकारदारचे तक्रारी वरून पोस्टे देवलापार येथे अप.क २७१/२०२६ कलम ३३१ (४),३०५ (अ) भा. न्या.स अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला.**

मा. श्री हर्ष ए. पोद्दार, वरीष्ठ पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा, श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा आणि श्री रमेश बरकते , उपविभागिय पोलीस अधिकारी , रामटेक यांच्या मार्गदर्शनात देवलापार पोलीस स्टेशनचे प्रभारी अधिकारी सपोनि श्री नारायण तुरकुंडे यांच्या नेतृत्वात गुन्हे शोध पथकाचे अधिकारी आणि अंमलदार यांनी गुप्त बातमीदार आणि तांत्रिक पुराव्याच्या मदतीने **वरील दोन्ही चोरीच्या गुन्हयाचा तपासात १) अंकित दिपक ताकोद, वय २६ वर्षे, यास वडसा , जि. गडचिरोली येथून ताब्यात घेऊन व आरोपी क्र.२) धनंजय लैनुराम मारखंडे, वय २८ वर्षे, आणि ३) आकाश उर्फ छैन्नू गोरलाल शाहू, वय २० वर्षे, दोन्ही रा. विजय नगर, संत**

कबीर शाळेजवळ, कळमना मार्केट नागपूर यांना नागपुर येथुन ताब्यात घेऊन त्यांचा कडे कौशल्यपुर्ण चौकशी करून त्यांचा सदर दोन्ही गुन्हयात सहभाग असल्याचे निष्पन्न झाल्याने त्यांना दिनांक ०८/०६/२०२६ रोजी अटक करून आरोपीतांच्या ताब्यातुन सदर गुन्हयात चोरीस गेलेला किराणा माल अंदाजे किंमत १२,४००/— रूपये आणि एकूण २० मोबाईल व ईलेक्ट्रीक साहित्य किंमती ५१,४०० /— रूपये असा एकुण ६३,८००/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. नमुद आरोपींचा दिनांक ११/०६/२०२६ रोजी पर्यंत पोलीस कोठडी रिमांड मंजुर आहे.

उघड झालेले गुन्हे

१) पोस्टे देवलापार अपराध क्रमांक २६७/२०२६ कलम ३३१ (४),३०५ (अ) भा.न्या.स

२) पोस्टे देवलापार अपराध क्रमांक २७१/२०२६ कलम ३३१ (४),३०५ (अ) भा.न्या.स



# अवैधरित्या रेतीची चोरटी वाहतुक करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा नोंद, ०४ लाख ०५ हजारांचा मुद्देमाल जप्त भिवापूर पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन भिवापूर** :— दिनांक ०८/०६/२०२६ रोजी भिवापूर पोलीस पेट्रोलींग करीत असतांना पोलीसांना गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की, अवैधरित्या रेतीची चोरटी वाहतूक केली जात आहे. मिळालेल्या माहितीच्या आधारे पोलीसांनी परसोडी भिवापूर येथे नाकाबंदी केली असता संशयित ट्रॅक्टर मुंडा क्र. एम एच ४०/सी एच ८४०७ व विना क्रमांकाची ट्रॉली मिळून आल्याने वाहन थांबवुन वाहनाची पाहणी केली असता त्यामध्ये रेती आढळुन आली. **ट्रॅक्टर चालक आरोपी नितेश धोंडुजी पाल, वय ३८ वर्ष, रा. वार्ड क्र. १, दिघोरा भिवापुर हा मिळुन आला.** आरोपीस रेती वाहतूकीच्या परवान्याबाबत विचारपुस केली असता त्याच्याकडे कोणताही परवाना नसल्याबाबत माहीती प्राप्त झाली.

**पोलीसांनी पंचासमक्ष ट्रॅक्टर मुंडा क्र. एम एच ४०/सी एच ७८४०७ व विना क्रमांकाची ट्रॉली किंमती ४,००,०००/— रूपये आणि ०१ ब्रास रेती किंमती ५०००/— रूपये असा एकुण किंमती ४,०५,०००/—रूपयांचा मुद्देमाल जप्त केला. नमुद आरोपी विरूध्द पोलीस स्टेशन भिवापूर येथे कलम ३०३(२), ४९, ३(५) भा.न्या.सं २०२३, सहकलम ४८(७), ४८(८) महाराष्ट्र जमीन महसुल संहीता अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.**



## पोलीस ठाणे जलालखेडा हद्दीत विशेष मोहीम राबवून मौजा बानोरचंद्र, उमठा येथे अवैधरित्या मोहाफुल गावठी हातभट्टीची दारू काढणाऱ्या तसेच देशी दारू विक्री करणाऱ्यांवर गुन्हे नोंद, ०१ लाख ०१ हजार २१० रूपयांचा मुद्देमाल जप्त जलालखेडा पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन जलालखेडा :—** दिनांक ०९/०६/२०२६ रोजी जलालखेडा पोलीस स्टेशन हद्दीतील मौजा बानोरचंद्र, उमठा येथे अवैधरित्या मोहाफुल गावठी दारू गाळणारे ,विक्री करणारे तसेच देशी दारू विक्री करणाऱ्यांविरोधात विशेष मोहीम राबविण्यात आली. मा. श्री हर्ष ए. पोद्दार, वरीष्ठ पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा, श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा आणि श्री. पराग पोटे, उपविभागिय पोलीस अधिकारी काटोल उपविभाग यांच्या मार्गदर्शनात जलालखेडा पोलीसांनी, दंगा नियंत्रण पथक आणि होमगार्ड यांच्यासह मौजा बानोरचंद्र, उमठा येथे **०५ पुरूष आरोपी व ०२ महिला आरोपी यांचेवर कारवाई करत नमुद ७ आरोपींवर ६ गुन्हे नोंद करण्यात आले.** पोलीसांनी घटनास्थळावरून एकुण २७० लिटर मोहाफुल गावठी दारू तसेच १६५० लिटर

मोहाफुल रसायन सडवा **तसेंच ०८ प्लॅस्टीक ड्रम** असा एकुण ९२,७५०/— रूपयांचा मुद्देमाल जप्त करून रनिंग हातभट्टया नष्ट केल्या. तसेच आरोपीतांचे ताब्यातून देशी दारूच्या ९४ निपा किंमती ८४६०/—रूपये असा एकुण १,०१,२१०/—रूपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

**पोलीसांनी घटनास्थळावरून पंचासमक्ष एकुण २७० लिटर मोहाफुल गावठी दारू तसेच १६५० लिटर मोहाफुल रसायन सडवा, देशी दारूच्या ९४ निपा असा एकुण १,०१,२१०/— रूपयांचा माल जप्त केला. नाशवंत मुद्देमाल मौक्यावर पंचनामा कार्यवाही करून नष्ट करण्यात आला. नमुद आरोपीतांविरुद्ध जलालखेडा पोलीस ठाणेस महाराष्ट्र दारूबंदी अधिनियमान्वये एकुण ०६ गुन्हे नोंदविण्यात आले आहे.**



# अवैधरित्या विनापरवाना देशी दारू विक्री करणाऱ्या आरोपीविरूद्ध गुन्हा नोंद, सावनेर पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन सावनेर :—** दिनांक ०८/०६/२०२६ रोजी सावनेर पोलीस पोस्टे हद्दीत अवैध धंदयावर कारवाई कामी पेट्रोलींग करीत असतांना पोलीसांना गुप्त बातमीदाराने खात्रीशीर माहीती दिली की, वार्ड क्र. ०१, आदासा कळमेश्वर, सावनेर, नागपुर येथे राहणारा आरोपी संजय बालाजी कडु हा अवैधरीत्या देशी दारू बाळगुन दारूची विक्री करीत आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीसांनी घटनास्थळी जावुन सापळा रचुन अवैधरित्या दारू विक्री करणाऱ्या **आरोपी संजय बालाजी कडु, रा. वार्ड क्र. ०१ आदासा कळमेश्वर, सावनेर, नागपुर** याला ताब्यात घेवुन त्याची पंचासमक्ष घरझडती घेतली असता त्याचे घराचे बेडरूममध्ये दिवानच्या देशी दारू मिळुन आली. नमुद आरोपीला दारू विक्री किंवा बाळगणे बाबत परवाना बाबत विचारणा केली असता त्याच्या कडे परवाना नव्हता.

**पोलीसांनी नमुद आरोपीच्या ताब्यातुन १) देशी दारूच्या २६३ निपा किंमती १०,५२०/— रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. आरोपीस पंचासमक्ष दारू बाळगण्याबाबत परवाना विचारले असता त्याने परवाना नसल्याचे माहीती प्राप्त झाली. आरोपी संजय बालाजी कडु, रा. वार्ड क्र. ०१ आदासा कळमेश्वर, सावनेर, नागपुर यांच्या विरूध्द पोलीस स्टेशन सावनेर येथे महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम अन्वये दाखल करण्यात आला आहे.**

# अवैधरित्या विनापरवाना देशी दारूची विक्री करणाऱ्या आरोपीविरूद्ध गुन्हा नोंद, भिवापुर पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन भिवापूर** :— दिनांक ०९/०६/२०२६ रोजी भिवापूर पोलीसांना गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की, **सिद्धार्थ नगर येथे एक महिला आपले राहते घरी अवैधरीत्या देशी दारूची विक्री करीत आहे**. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीसांनी घटनास्थळी जावुन सापळा रचुन अवैधरित्या दारू विक्री करणाऱ्या महिला आरोपी हिला ताब्यात घेवुन तिची पंचासमक्ष झडती घेतली असता महीलेच्या हातात असलेल्या थैलीमध्ये नमुद आरोपीचे ताब्यात देशी दारू मिळुन आली.

**पोलीसांनी नमुद महिला आरोपीच्या ताब्यातुन १) देशी दारूच्या ०७ निपा किंमती ५६०/— रूपये तसेच दारू विक्रीचे १७००/—रूपये मिळुन आले. असा एकुण २२६०/— रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. आरोपीस पंचासमक्ष दारू बाळगण्याबाबत परवाना विचारले असता तिने परवाना नसल्याचे सांगीतले. नमुद आरोपी विरूध्द पोलीस स्टेशन भिवापूर येथे महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.**

## नागपूर ग्रामीण जिल्हयात अवैध जुगार चालवणाऱ्यावर ०३ गुन्हे नोंद.

दिनांक ०८/०६/२०२६ रोजी महाराष्ट्र जुगार कायदा अंतर्गत पोलीस स्टेशन कन्हान, नरखेड यांनी अवैधरित्या सट्टापट्टी जुगार खेळणाऱ्या/खेळविणाऱ्या आरोपीतांवर छापा टाकुन सट्टापट्टी साहित्य व रोख रक्कम असा एकुण २०९७/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला. महाराष्ट्र जुगार अधिनियमान्वये एकुण ०३ गुन्हे दाखल करण्यात आले आहे. ते खालीलप्रमाणे.

**पोलीस स्टेशन कन्हान** येथे आरोपी नामे मधुकर मुलचंद नागपूरे, वय ६७ वर्ष, रा. रामनगर गुरखडे ले आउट, तारसा रोड, कन्हान हा अवैधरित्या सट्टापट्टी चालवितांना मिळुन आल्याने त्याचेवर महाराष्ट्र जुगार अधिनियमान्वये ०१ गुन्हा नोंद. **पोलीस स्टेशन नरखेड** येथे आरोपी नामे भरतसिंह ओंकारसिंह चौहान, वय ४२ वर्ष, रा. बेलोना, त. नरखेड, जि. नागपुर आणि सुरेश व्यंकटराव जाधव, वय ५६ वर्ष, रा. मोवाड त. नरखेड जि. नागपुर हे दोघेही अवैधरित्या सट्टापट्टी चालवितांना मिळुन आल्याने त्याचेवर महाराष्ट्र जुगार अधिनियमान्वये प्रत्येकी ०१ गुन्हा असे ०२ गुन्हे नोंद करण्यात आला आहे.

# नागपुर ग्रामीण जिल्ह्यातील ८०६ रेकॉर्डवरील आरोपीतांची घेण्यात आली आरोपी परेड

मा. श्री हर्ष ए. पोद्दार, वरीष्ठ पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा आणि श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामीण यांच्या मार्गदर्शनात आज दिनांक ०९/०६/२०२६ रोजी नागपुर ग्रामीण जिल्हयातील सर्व २३ पोलीस स्टेशनला शरीराविरूध्दचे गुन्हे करणारे, मालमत्ते विरूध्दचे गुन्हे करणारे, महीला व बाल अत्याचार गुन्हेगार ,अवैध दारू, जुगार इतर अवैध धंदयामधील रेकॉर्डवरील आरोपींतांची आरोपी परेड घेण्यात आली आहे. **एकुण ८०६ आरोपीतांची आरोपी परेड घेण्यात आली आहे.**

**नागपुर उपविभाग** :— नागपुर उपविभागातील पोलीस स्टेशन बुट्टीबोरी येथे ३१ आरोपी, पोलीस स्टेशन एमआयडीसी बोरी येथे ३० आरोपी आणि पोलीस स्टेशन बेला येथे ३३ आरोपी अशा एकुण ९४ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**उमरेड उपविभाग** :— उमरेड उपविभागातील पोलीस स्टेशन उमरेड येथे ४८ आरोपी , पोलीस स्टेशन कुही येथे ३४ आरोपी आणि पोलीस स्टेशन भिवापुर येथे २१ आणि पोलीस स्टेशन वेलतुर ३५ आरोपी पोलीस स्टेशन पाचगाव १२ आरोपी अशा एकुण १५० रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**सावनेर उपविभाग :—** सावनेर उपविभागातील पोलीस स्टेशन सावनेर येथे ६४ आरोपी , पोलीस स्टेशन कळमेश्वर येथे ३४ आरोपी आणि पोलीस स्टेशन खापा येथे २७ आरोपी आणि पोलीस स्टेशन केळवद येथे ३३ आरोपी अशा एकुण १५८ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**कन्हान उपविभाग** :— कन्हान उपविभागातील पोलीस स्टेशन कन्हान येथे ३५ आरोपी , पोलीस स्टेशन मौदा येथे २१ आरोपी पोलीस स्टेशन वडोदा येथे १४ आरोपी अशा एकुण ७० रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**रामटेक उपविभाग :—** रामटेक उपविभागातील पोलीस स्टेशन रामटेक येथे ४५ आरोपी , पोलीस स्टेशन पारशिवणी येथे ३५ आरोपी, पोलीस स्टेशन अरोली येथे ३२ आरोपी आणि पोलीस स्टेशन देवलापार येथे २२ आरोपी अशा एकुण १३४ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**काटोल उपविभाग :—** काटोल उपविभागातील पोलीस स्टेशन काटोल येथे ६१ आरोपी , पोलीस स्टेशन कोंढाळी येथे ३१ आरोपी आणि पोलीस स्टेशन नरखेड येथे ६५ आरोपी आणि पोलीस स्टेशन जलालखेडा येथे ४३ आरोपी अशा एकुण २०० रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**(सर्व ६ उपविभागातील सर्व २३ पोलीस स्टेशन येथे एकुण ८०६ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे. )**



मा. पोलीस अधिक्षक
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
यांच्या मान्यतेने